Mail Id - aditiexpress33@gmail.com

दैनिक अदिती एक्सप्रेस

Website: www.aditiexpress.in epaper.aditiexpress.in संपादक - गंगाधर अभंग डिगोळे

नारायणा ई-टेक्नो स्कूलमध्ये सायबर सुरक्षा जनजागृतीचा प्रभावी उपक्रम

दै. अदिती एक्सप्रेस

लातूर : राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्रिक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती अभियानांतर्गत शुक्रवार (दि. ७ ऑगस्ट) नारायणा ई-टेक्नो स्कूल, लातूर येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम पार पडला.

सकाळी ८:३० ते ९:१० या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात इयत्ता ५ वी ते १० वी मधील ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सायबर ऑफिसर नेहल बुलानी व सायबर ऑफिसर नम्रता तौर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांना गेम्स चे दुष्परिणाम, कृत्रिम बुद्धिमत्ताचा वापरून तयार होणाऱ्या प्रतिमा, मजबूत पासवर्ड तयार करण्याची योग्य पद्धत, तसेच मोबाईलमध्ये ॲप इन्स्टॉल करताना आवश्यक आणि अनावश्यक परवानग्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. याशिवाय ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अनेक शंकांचे निरसन करून घेतले. विद्यालयाचे मुख्याध्यापक रविकांत शिंदे सर तसेच सर्व शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचा संदेश देण्यात आला , व त्यांच्या कडून प्रतिज्ञा म्हणून घेतली... आणि सर्वांना सायबर जागरूक करून हा कार्यक्रम संपन्न झाला.